विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र
यशवंतराव चव्हाण -एक द्रष्टे भारतीय नेतृत्त्व

दिनांक २४ नोव्हेंबर २०१२ रोजी आदर्श महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्यावतीने ''यशवंतराव चव्हाण - एक द्रष्टे भारतीय नेतृत्व'' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ मा. डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते पार पडले. डॉ. जोशी यांनी आपल्या 'यशवंतराव चव्हाण व्यक्ति आणि कर्तृत्व' या विषयावरील बीज भाषणात यशवंतराव चव्हाणांच्या विशाल व्यक्तिमत्वाचा परिचय करुन देतांना यशवंतरावांचा राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक प्रबोधनाचा प्रवास देवराष्ट्र ते दिल्ली व्हाया कृष्णकाठ असा सांगून देशाच्या राजकारणाला सांस्कृतिक चेहरा देण्याचे काम त्यांनी केले असे मत व्यक्त केले. शिवाय सावरकरांच्या व्यक्तिमत्वाबद्दल यशवंतरावांच्या मनातील आदर त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला तसेच यशवंतरावांच्या बेरजेच्या राजकारणाची संकल्पना मांडून त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनातील विविध पैलूंवर, त्याच्या दांडग्या स्मरणशक्तीवर व साहित्यिक अभ्यासावर आपले विचार मांडले. पुरोगामी महाराष्ट्राचा सक्षम पाया उभारण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. केंद्रीय स्तरावर महत्वाच्या पदांवर विराजमान होऊन देखील त्यांची नाळ महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेली होती. ते आपल्या ध्येयापासून विचलीत होतांना दिसले नाही. ते एक निष्कलंक राजकारणी होते. शासकीय विश्रामगृह सोडल्यानंतर देखील त्यांनी साधी रहाणी स्वीकारली व राजकारणात राहूनही धनसंचयाचा कोणताही विचार त्यांच्या वागण्यात दिसत नव्हता अशा विविध मुद्दयांचा उल्लेख डॉ. जोशी यांनी आपल्या व्याख्यानांतून केला व उपस्थितांना यशवंतराव चव्हाण यांची वेगळी ओळख करुन दिली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनी आपल्या प्रास्ताविकात चर्चासत्राची उद्दिष्टये सांगून यशवंतराव चव्हाणांच्या कार्याचा गौरव केला.

या चर्चासत्राच्या पहिल्या सत्राचे प्रमुख वक्ते जेष्ठ पत्रकार मा. श्री. हेमंत देसाई यांनी 'यशवंतराव चव्हाणांचेअर्थकारण व नेतृत्व' या विषयावर प्रकाश टाकताना त्यांची लोकशाही विकेंद्रीकरणाची कल्पना, किमान जमीनधारणा कायदा, ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांच्या दृष्टीने साखर कारखान्यांची निर्मिती, शिक्षणसंस्थांची स्थापना, विविध लोकोपयोगी योजना व विश्वकोश मंडळाची स्थापना या बाबतीत यशवंतरावांचे योगदान यावर भाष्य केले. तसेच वैचारिक व तात्विक दृष्ट्या विचार केल्यास वर्तमानकाळातील राजकारण्यांपेक्षा यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने श्रीमंत राजकारणी होते असे मत व्यक्त केले.

चर्चासत्राच्या द्वितीय सत्रात लोकमतचे निवासी संपादक मा.श्री.विनायक पातृडकर यांच्या उपस्थितीत अनेक शिक्षक प्रतिनिधींनी आपल्या शोधनिबंधांचे वाचन केले. तद्नंतर मा. श्री.विनायक पातृडकर यांनी 'यशवंतराव चव्हाण: समाजकारणी द्रष्टा' या विषयावर विचार व्यक्त करतांना त्यांच्या सामाजिक व प्रशासकीय कार्यपध्दतीचा आढावा घेतला व पंचायत राज्यव्यवस्था आणि सामाजिक दृष्टया सर्वघटकांसाठी आवश्यक अशा त्यांच्या कार्याचा उल्लेख केला आणि महत्वाचे म्हणजेच पुरोगामी महाराष्ट्र हा फुले - शाहू - आंबेडकर आणि यशवंतराव यांचा आहे असे मत व्यक्त केले.

सदर चर्चासत्रात विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, राजकारणातील जाणकार व्यक्ती व विशेषत: विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैदेही दप्तरदार, आयोजन समिती सदस्य प्रा. डॉ. श्रध्दा सोमण, प्रा.मंदार ठाकूर, प्रा. संदिप भेले व प्रा. लक्ष्मीकांत सातपुते यांनी अथक परिश्रम घेतले. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. समारोप करताना चर्चासत्राचे समन्वयक प्रा. आत्माराम बांदल यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.

- प्रा.आत्माराम बांदल
समन्वयक

❖❖